पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक ३०/०६/२०१९

## जांभुळखेडा बॉम्बस्फोट प्रकरणात आणखी एकाला अटक

### आता पर्यंत एकूण आठ आरोपींना अटक करण्यात पोलीसांना यश

दिनांक 01/05/2019 रोजी कुरखेडा पासुन 6 किमी अंतरावर असलेल्या मौजा- जांभुळखेडा ते पुराडा रस्त्यावर नक्षलवाद्यांनी भुसुरुंग स्फोट घडवुन आणल्याने 15 पोलीस जवान शहीद झाले व एक खाजगी वाहन चालक मरण पावले.सदर प्रकरणात गडचिरोली पोलीस दलाने तपास चक्र फिरवुन नक्षलवादयांची दंडकारण्य स्पेशल झोनल समितीची सदस्या तसेच वेस्टर्न सब झोनल प्रमुख उप्पगुंटी निर्मलाकुमारी ऊर्फ नर्मदाक्का रा. कोडापावनुरु गलावरम मंडल जि. कृष्णा (आं.प्र.) व तिचा पती सत्यनारायण ऊर्फ किरण ऊर्फ किरणदादा याचेसह गडचिरोली पोलीसांनी अटक केली होती. दिनांक 19/06/2019 रोजी गडचिरोली पोलीस दलातील तपास पथकांकडून तेलंगाणा राज्यामधील सर्च मधून लॅपटॉप, मोबाईल, पेनड्राईव्ह व इतर संशयित साहित्य जप्त करण्यात आले. या गुन्हयातील इतर आरोपीतांच्या सहभागाविषयी या दोन्ही जहाल नक्षलवादयांकडे विचारपुस केली तसेच इतर पुराव्याचे आधारे गडचिरोली पोलीस दलाने कुरखेडा तालुक्यातील मौजा लवारी येथील आरोपी नामे 1) दिलीप श्रीराम हिडामी वय 22 वर्ष, 2) परसराम मंगाराम तुलावी वय 28 वर्ष यांना तसेच दिनांक 23/06/2019 रोजी आणखी तीन आरोपी नामे 1) सोमसाय दलसाय मडावी वय 28 वर्ष, 2) किसन सिताराम हिडामी वय 42 वर्ष, 3) सकरु रामसाय गोटा वय 35 वर्ष तिघेही रा. लवारी ता. कुरखेडा जि. गडचिरोली यांना अटक करण्यात आली होती.

दिनांक 29/06/2019 रोजी गडचिरोली पोलीस दलाने आणखी एका आरोपीला अटक करण्यात यश मिळविले असुन त्याने भुसूरुंग स्फोट करीता वापरण्यात आलेले स्फोटक साहीत्य पुरवठा केले होते. सदर आरोपीचे नाव 1) कैलास प्रेमचंद रामचंदानी वय 34 वर्ष रा. कुरखेडा जि.गडचिरोली असे आहे.सदर आरोपीला आज मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी गडचिरोली यांचे न्यायालया समोर हजर केले असता मा. न्यायालयाने सदर आरोपीस दिनांक 12/07/2019 पर्यंत 13 दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असुन घटनेचा पुढील तपास गडचिरोली पोलीस करीत आहे.